Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
UGC Approved Sr.No.64259
Vol - V Issue-IV APRIL 2018 ISSN 2349-638x Impact Factor 4.574

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा स्त्री विषयक दृष्टिकोन

डॉ. मंदा तडस.
गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख
कला व विज्ञान महाविद्यालय, पुलगाव
ता. देवळी जि. वर्धा

डॉ. मेघा सबाने
गृहअर्थशास्त्र विभाग
कला व विज्ञान महाविद्यालय, पुलगाव
ता. देवळी जि. वर्धा

आधुनिक भारताच्या इतिहासातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे असामान्य प्रतिभावंत कायदेपंडित होते. ते अर्थशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र व मानववंशशास्त्र अशा अनेक शास्त्रातील विद्वान होते. तसेच समाजकारण, धर्मकारण, राजकारण, आणि पत्रकारिता या क्षेत्रात त्यांनी अतिशय महत्त्वपूर्ण कामगिरी केली आहे. ते एक युगपुरुष नेते म्हणूनही ओळखले जातात. कारण हजारो वर्षापासून चालत आलेल्या भारतीय समाजव्यवस्थेच्या विरुद्ध बंड पुकारण्याचे काम त्यांनी केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कालखंडात महिलांची परिस्थिती अतिशय दयनीय होती. मुलींचा जन्म अतिशय दु:खद बाब समजली जायची. परंतु बाबासाहेबांनी स्त्रीला सर्वोच्च उपयोगी व महत्त्वाचे म्हटले आहे. कारण तिच्यापासूनच बोधिसत्व आणि सम्राट जन्म घेतात त्यांच्या दृष्टीने मुलींचा जन्म दु:खद नसून आनंदाचाक्षण असतो. सात मौल्यवान रत्नांपैकी स्त्री एक रत्न आहे, असे त्यांचे मत होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर ज्या संस्कृतीचेनिर्माते आहे. ती संस्कृती संपूर्ण माणूस म्हणून स्त्रीचा सन्मान करणारी संस्कृती आहे. भारताच्या संविधान संस्कृतीचे मनसूत्रमय पद्धतीने तिच्यातील विचार व्यक्त झाले आहे. चौदाव्या अनुच्छेदाने तिला समता बहाल केली आहे. स्त्री पुरुष यांच्यातील विषमता संविधानाच्या पंधराव्या अनुच्छेदाने रद्दकेलेली आहे आणि स्त्रीयाच्या प्रतिष्ठेला उणेपणा आणणाऱ्या सर्वप्रथा पूर्णपणेनष्ट करायला सांगितल्या आहे. स्त्री ही ''Preamble'' अंतर्भूत भारताच्या लोकांमधील सन्माननीय व्यक्ती आहे. ती ''वन मॅन'' आहे म्हणून तिला इतर सर्वांसोबतच एक मूल्यही आहे. ती भारताची नागरिक आहे आणि संविधानाने जे हक्क जी स्वप्ने दर्जा व संधीची समानता व सर्वच गोष्टी भारताने सन्माननीय नागरिक म्हणून सर्वांनाच दिल्या त्या सर्वच बाबी संविधानाने तिलाही दिलेल्या आहे. म्हणजेच तिचे पारंपरिक दुय्यमत्व इथे पार मोडित काढले गेले आहे. त्यामुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महिला विषयीचे तत्त्वज्ञान व विचार अत्यंत प्रभावशाली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्री विषयक सामाजिक विचार :

स्त्री विषयक सामाजिक भूमिका मांडताना बाबासाहेब म्हणतात की, आपल्या पतीचा, मुलाबाळांचा, आपल्या कुटुंबाचा व कुळाचा नावलौकिक स्त्रियांच्या शीलावर अवलंबून आहे. स्त्रीने पतीची मैत्रीण बनून त्यांच्याकार्यात सहकार्य द्यावे. मात्र पतीने गुलामासारखे वागवल्यास खंबीरपणे नकार द्यावा वसमतेसाठी आग्रह धरावा असे समजावत बाबासाहेब पुढे म्हणतात की,व्यक्तीचे ''ऐश्वर्यापेक्षा नीतीने जीवन कंठणे महत्त्वाचे आहे.''

स्त्रियांची प्रगती म्हणजे समाजाची प्रगती असे मोजमाप करणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा स्त्रियांच्या संघटनेवर फार मोठा विश्वास होता. त्याकरिता स्त्रियांना विश्वासात घेवून समाजाची सुधारणा करता येवू शकते. असे त्यांचे मत होते. स्त्रियांमध्ये मोठे सामर्थ्य आहे. याविषयी ते ठाम होते. तसेच समाजातील दोष नाहीसे करण्यासाठी स्त्रियांनी फार मोठी सेवा केली आहे. असेत्यांचे मत होते. पुरुषांबरोबर स्त्रियाही सहभागी होवून कठीणातली कठीण कामे स्त्रिया करु शकतात. अशी बाबासाहेबांना खात्री असल्यामुळे स्त्रियांच्या प्रगतीवर अधिक भर दिला पाहिजे. असा त्यांचा सामाजिक विचार होता.

स्त्री मुक्ती चळवळीला चालना :

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्री मुक्तीच्या चळवळीला गतीमान करण्यासाठी समाज प्रबोधन आणि कायद्याचा आधार घेतला स्त्री मुक्तीबाबातचा विचार मांडताना समाजीक चळवळ ही केवळ पुरुषांनीचा चालवावी असे नाही तर त्यामध्ये स्त्री सहभाग हा सुद्धा महत्वाचा असतो. तसेच कोणत्याही समाजाच्या प्रगतीचे मोजमाप स्त्रियांच्या प्रगतीवरुनच केले जाते म्हणूनच सामाजीक चळवळीमध्ये स्त्रियांचा सहभाग असला पाहिजे असे डॉ. बाबासाहेबांचे विचार होते यावरुनच त्यांची स्त्री सुधरवादी दृष्टि पाहायलाच मिळते.

स्त्री मुक्ती व स्त्री प्रगतीचा विचार मांडतांना बाबासाहेब म्हणतात की, मुलीचे लग्न लवकर करुन त्यांच्यावर वैवाहिक जिवणाच्या जबाबदाऱ्या लादु नका त्यांना शिक्षण घेवून द्या असे सांगतात. त्याचबरोबर लग्नानंतर पत्नीला समान आधिकार द्या ती गृहीनी असली पाहिजे ती गुलाम असता कामा नये, त्यांचे हे विचार स्त्री पुरुष समानते साठी अत्यंत महत्वाचे वाटतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना म. फुले, कबीर, गौतम बुद्ध या तीन गुरुच्या कडून स्त्री मुक्तीची वैचारीक पार्श्वभूमि लाभली होती म्हणूनच त्यानी स्त्रीयांसाठी महत्वपूर्ण कार्य केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा स्त्री–शिक्षण विषयक दृष्टिकोण :

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या विचार व कृतीतून सतत स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केला होता. महाड येथे समता संग्रामाच्या वेळी स्त्रियांना उद्देशून बोलताना ते म्हणाले होते की, 'ज्ञान आणि विज्ञान' या फक्त पुरुषांसाठीच नाही तर प्रत्येकाने आपल्या मुलींना शिक्षण दिले पाहिजे. अखिल भारतीय महिला परिषदेत त्यांनी स्त्रियांना शिक्षित व्हा, मुलांना शिकवा तरच देशाची प्रगती होईल, असा संदेश दिला. कुटुंबात जर स्त्री शिक्षित असेल तर संपूर्ण कुटुंब सुधारेल. मुलींना उपयुक्त व व्यवहारोपयोगी शिक्षण द्यावे असे सांगून दलित स्त्रियांच्या हातात लेखनी दिली. स्त्री वर्गात शैक्षणिक जागृती निर्माण केली. १९२४ मध्ये नागपूर येथे कन्या शाळा उभारण्यात आली.अंजनाबाई देशभ्रतार यांच्या सहकार्याने अस्पृश्य मुलींचे अनाथालय चालविण्यात आले. मुलांना व मुलींना १४ वर्षापर्यंत मोफत व सक्तीने शिक्षण देण्याची व्यवस्था केली पाहिजे. अशी तरतूद त्यांनी संविधानात त्यावेळी केली होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जातिव्यवस्थेविषयी विचार :

जातिव्यवस्था आणि स्त्री या दोन कड्या विलक्षण पद्धतीने एकमेकांत गुतलेल्या आहेत. स्त्रीला जातीचे प्रवेशद्वार करण्यात एक मोठे राजकारण आहे. कारण स्त्रीमुळेच जातिव्यवस्था जिवंत ठेवता येते आणि जातिव्यवस्था ही स्त्रीवर नियंत्रण ठेवते. जातीअंतर्गत विवाह हे स्त्री दास्याचे आणि जातीचेही संरक्षक कवच आहे. जोपर्यंत स्त्री जातीमुक्त होत नाही. तोपर्यंत जात मुक्त होत नाही आणि जात टिकून राहील तोवर स्त्री मुक्ती होवूच शकत नाही. याचाच अर्थ म्हणजे 'स्त्री' मुक्ती आणि 'जाती मुक्ती' हे दोन वेगवेगळे प्रश्न नाही तर तो एकच प्रश्न आहेआणि त्याची सोडवणूक करण्यानेच मानवमुक्ती शक्य आहे, असे त्यांचे मत होते. जातीचे आणि स्त्रीदास्यांचे जटिल कार्य धर्माने केले आहे. म्हणूनच स्त्री मुक्तीसाठी आणि जातीमुक्तीसाठी धर्ममुक्ती ही आवश्यक बाब आहे. धर्मवादी पुरुषत्वाने जसे पुरुषांना श्रेणीमुक्त विषमतेमध्ये डांबलेले आहे. धर्म टिकवण्यासाठी जातीत लग्न करणे आवश्यक असते म्हणूनच डॉ. बाबासाहेबांनी आंतरजातीय व आंतरधर्मीय लग्न व्यवस्थेला प्रोत्साहन दिले आहे.वर्णव्यवस्थेमध्ये स्त्रियांना शूद्रांपेक्षाची खालचा दर्जा दिला जात होता. यातूनच संविधानाने स्त्रियांना समान दर्जा मिळाला.

स्त्री विषयक कायदा :

कोणत्याही देशाच्या प्रगतीचे मोजमाप हे स्त्रियांच्या प्रगतीच्या आधारे केले जाते. भारतातील सर्व धर्मीय महिला सक्षम होण्यासाठी त्यांनी सामाजिक चळवळ सुरुकेली. या चळवळीला गतिमान करण्यासाठी समाज प्रबोधन व कायदा करण्यात आला. स्त्रियांमधील प्रेरक शक्ती जागृत करण्यासाठी त्यांनी महिला परिषद घेतल्या. भारतीय स्त्रियांची आर्थिक व सामाजिक गुलामगिरी कायद्याच्या माध्यतातून नष्ट केली. भारतीय संविधानाच्या मुलभूत अधिकारांमध्ये समतेचा अधिकार (अनुच्छेद क.१४–१८) मान्य करण्यात आला. यानुसार स्त्री–पुरुष भेद नष्ट करुन सर्व नागरिकांना समानता देण्यात आली. गीरणी, कारखाने, शेतीत काम करण्याऱ्या स्त्रिया व खाणित काम करणाऱ्या स्त्रियांना सुद्धा पगारी रजा, प्रसूती रजा व लहान मुलांसाठी पाळणागृहे असावी तसेच स्त्रियांना पुरुषांबरोबर मतदानाचा अधिकार असावा असे आंबेडकरांचे विचार होते.स्त्रियांना स्वतंत्र व्यक्ती म्हणून जगता यावे यासाठी हिंदू कोडबिल तयार करुन त्या स्त्रियांना विशेष आधिकार देण्यात आले. जसे स्त्रियांना घटस्फोटाचा आधिकार, नवऱ्याने घटस्फोट दिल्यास पोटगीचा अधिकार, द्विभार्या प्रतिबंधक कायदा, वारसा हक्क, दत्तक कायदा, व्यक्ती स्वातंत्र्य इत्यादी बाबींना कायद्याचे रुप दिले. यामुळे भारतीय स्त्रियांच्या विकासाचा मार्ग मोकळा झाला. म्हणूनच वर्तमानकाळात क्लार्कपासून जिल्हाधिकारीपर्यंत, प्राध्यापकापासून सचिवापर्यंत, पोलीसापासून सैनिकापर्यंत, सरपंचापासून प्रधानमंत्री व राष्ट्रपती पर्यंत तसेच व्यावसायिक क्षेत्रातही स्त्रियांनी आपल्या सामर्थ्यावर कितीतरी जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडली.

स्त्री सक्षमीकरण विषयक विचार :

डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी त्यांना समाजात सन्मान व प्रतिष्ठा प्राप्त करुन देण्यासाठी भगवान बुद्धांचे कार्य सुरुच ठेवले. अस्पृश्यांचा सर्वांगीण विकास करणे हे जसे बाबासाहेबांचे ध्येय होते. त्याचप्रमाणे स्त्रियांना सक्षम करणे हे पूरक ध्येय ठेवून एक योजना आखली. त्यांनी 'बहिष्कृत भारत' हे वृत्तपत्र सुरु केले.त्यातून लोकजागृती करुन महिला वर्गामध्ये जनजागृती आणण्याचा प्रयत्न केला.तसेच हिंदू कोडबीलामध्ये नवीन स्वरुपात हिंदू स्त्रियांना नवीन जीवन प्रदान केले. जीवनात सशक्त होत उभे राहण्यासाठी लागणारे बळ प्रदान केले. स्त्री पुरुषांना समान व सहशिक्षण देण्यावर त्यांनी भर दिला. एवढेच नसून महिला सक्षमीकरण्याची सुरुवात त्यांनी आपल्या घरापासून म्हणजेच स्वत:च्या पत्नीला शिकवून केली. स्त्री सक्षमीकरणात नवीन पाऊल टाकत महत्त्वाचे योगदान दिले. भारताला विकसनशील राष्ट्रबनवायचे असेल तर स्त्री प्रगतीशीवाय पर्याय नाही, देशाच्या विकासाचे चित्र डोळ्यासमोर ठेवून डॉ. बाबासाहेबांनी स्त्री अवनतीला पोहचविणाऱ्या मनस्मृतीचे दहन २५ डिसेंबर १९२७ रोजी केले.

निष्कर्ष –

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना फुले, कबीर व बुद्ध या तीन गुरुंकडून स्त्री मुक्तीची वैचारिक पार्श्वभूमी लाभली होती. तत्कालीन समाजातील अस्पृष्यसमाजासारखी स्थिती स्त्रियांची असल्याने त्यांनी आपल्या विचार व कृतीतून स्त्री मुक्तीचे कार्य केले.
२. स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचा समान दर्जा, अधिकार, प्रतिष्ठा प्राप्त करुन देण्यासाठी महत्त्वपूर्ण कार्य केले.
३. भारतीय संविधानाच्या माध्यमातून स्त्रियांवर लादलेली हजारो वर्षाची गुलामगिरी कायद्याने नष्ट केली. त्यांनी स्त्रीशिक्षणचा पुरस्कार करुन स्त्री पुरुष समानता निर्माण केली.
४. हिंदू कोडबिलाच्या माध्यमातून स्त्री–पुरुष समतेचा विचार रुजविण्याचा प्रयत्न केला.
५. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानाच्या प्रभावामुळेच क्लार्क पासून जिल्हाधिकारीपर्यंत व सरपंचापासून राष्ट्रपती पर्यंत तर व्यावसायिक क्षेत्रात व इतर क्षेत्रातही स्त्रियांची प्रगती शक्य झाली.

संदर्भ :

१. डॉ. यशवंत मनोहर, 'नवसंस्कृतीचे जनक : डॉ. बाबासाहेब आंबेडकर', नॉलेज मिशन प्रकाशन, औरंगाबाद, पृष्ठ क्र
२. डॉ. उत्तम सावंत, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर : गौरव ग्रंथ', निर्मल प्रकाशन,नांदेड, २६.८.२०१३ पृष्ठक्र ३१३ व ३१५
३. डॉ. सुनंदा अहिरे व डॉ. उषा साळुंके'स्त्री अभ्यासाच्या दिशा', अथर्व पब्लीकेशन,प्रथम आवृती १०.१.२०१२ पृष्ठक्र .१०७
४. प्रा. अनिल काळपांडे व प्रदीप इंगोले डॉ. सुभाष खंडारे, 'सर्वांसाठी बाबासाहेब' सुधीर प्रकाशन वर्धा, २०१२ पृष्ठक्र.६५
५. डॉ. बी. आर. आंबेडकर,'हिंदू स्त्रियांची उन्नती व अवनती' सुगत प्रकाशन, नागपूर, पृष्ठक्र
६. मासिक लोकराज्य एप्रिल २०१५ महामानव 'आपला आदर्श, आपली प्रेरणा', पृष्ठ क्र. १५
७. भास्कर लक्ष्मण भोळे,'संदर्भ दलित चळवळीचा', बजाज पब्लिकेशन, अमरावती, पृष्ठ क्र
८. स्नेहलता वामन निंबाळकर,'उद्रेक महिला समस्यांचा व सुप्त ज्वालामुखीचा', प्रबोधन प्रकाशन, २६.९.२०१४ नागपूर, पृष्ठक्र.७६
९. अर्थसंवाद जुन २०१६ मराठी अर्थशास्त्र त्रैमासिक पृष्ठ क्र.८७